महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
५ वा मजला, मुख्य इमारत
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२०२६९१३ Email ID : shrikant.yadav@nic.in

---

क्रमांक : संकीर्ण-११२५/प्र.क्र.८८/का-३ दिनांक:- ०१ ऑक्टोबर, २०२५.

प्रति,

मा. महाप्रबंधक,
मा. उच्च न्यायालय,
मुंबई-३२.

**विषय:**-पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुर्नस्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्तीबाबत.

**संदर्भ:**- आपले क्र.A.१२१९/२०१७/१२६५/२०२५, दि.१०.०७.२०२५ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्रान्वये श्री.श्रीधर एम.भोसले, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुर्नस्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदासाठी शिफारस केली होती. त्याअनुषंगाने महसूल व वन विभागाने श्री.श्रीधर एम.भोसले, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुर्नस्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्ती कारणास्तव राजपत्रामध्ये अधिसूचना प्रसिध्द करावयाची असल्याने श्री.भोसले यांना त्यांच्या वैयक्तिक तपशीलाबाबतची माहिती उपलब्ध देण्याबाबत ईमेलद्वारे विनंती केली असता, त्यांनी ईमेलद्वारे त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव सदर नियुक्तीबाबत असमर्थता दर्शविली आहे.

२. सबब, महसूल व वन विभागाने पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुर्नस्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर तातडीने नियुक्तीसाठी अन्य न्यायिक अधिकाऱ्याची शिफारस करण्याबाबतची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुर्नस्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्तीसाठी जिल्हा

न्यायाधीश संवर्गातील सुयोग्य न्यायिक अधिकाऱ्याचे नाव या विभागास लवकरात लवकर कळविण्याची विनंती करण्यात येत आहे.

आपला,

( श्री.च.यादव )
**कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन**

सहपत्र: वरीलप्रमाणे

**Note # 14**

महसूल व वन विभाग/पुनर्वसन-०१

विधि व न्याय विभागाच्या Note # ८ येथील टिप्पणीस अनुसरुन पुन्हा सादर.

०२. पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर जिल्हा न्यायाधीश संवर्गातील सुयोग्य न्यायिक अधिका-यांच्या नावाची शिफारस प्राप्त करण्याबाबत मा. उच्च न्यायालयास विनंती करण्यात यावी, अशी विनंती दिनांक ३०.०४.२०२५ रोजीच्या टिप्पणीन्वये विधि व न्याय विभागास करण्यात आली होती. त्यानुसार महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १०.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये श्री.श्रीधर एम.भोसले, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदासाठी मा. उच्च न्यायालयाने शिफारस केली असुन त्यानुसार कार्यवाही करुन त्याची प्रत उपलब्ध करावी, असे विधि व न्याय विभागाने Note # ८ येथील टिप्पणीन्वये कळविले आहे.

०३. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १०.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या शिफारशीनुसार श्री.श्रीधर एम.भोसले, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यंची नियुक्ती करण्यास्तव राजपत्रामध्ये अधिसूचना प्रसिध्द करावयाची असल्याने श्रीधर एम.भोसले, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांचा वैयक्तिक तपशील जसे जन्म दिनांक,सेवानिवृतीचा दिनांक इत्यादिबाबत माहिती प्राप्त करण्यासाठी त्यांना विनंती करण्याबाबत ईमेल पाठविला असता त्यांनी कार्यासन र-१ च्या deskr१rev.mu-mh@gov.in या अधिकृत ईमेल आयडी ऐवजी desk१rev.mu-mh@gov.in या चुकीच्या ईमेल आयडीवर व प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांच्या rg-bhc@nic.in या ईमेल आयडीवर दिनांक २३.०७.२०२५ रोजी ईमेल पाठवुन नमूद करुन पुढीलप्रमाणे कळविले आहे-

---------- Forwarded message ---------

From: Shridhar Bhosle <shridharbhosle@gmail.com>

Date: Wed, २३ Jul, २०२५, १:५७ pm

Subject: Submission of Personal Service Details for Notification § Appointment as PO, Land Acquisition Authority, Chhatrapati Sambhajinagar.

To: <desk१rev.mu-mh@gov.in>



File No. R&FD-66061(61)/18/2025-MRF(DESKR1)-Revenue and Forest (Computer No. 1102745)
ASSISTANT SECTION OFFICER, LAW AND JUDICIARY DEPARTMENT on 01/10/2025 10:55 AM

Cc: <rg-bhc@nic.in>

Respected sir,

Apropose the subject, I regret to submit, that due to my mother ८५ years old, staying with me recently had a heart attack and under treatment, I am unable to join at Sambhajinagar. Therfore, I withdraw my cosent for Sambhajinagar, hence unable to submit the information sought vide your email dated २३.७.२०२५. Sorry, for inconvenience caused to the department.

I, humbly further submit that, I have learnt that a Bench is likly to be constituted at Pune and Mumbai. I request to please consider my nominicature fot the same, in case it are constiyuted in future.

With Warm Regards,

(Shridhar M Bhosale)

Retd. PDJ, Buldhana

०४. प्राधिकरणाच्या कार्यासाठी "पीठासीन अधिकारी" (Presiding Officer) नेमण्याची तरतूद अधिनियमात आहे. कलम ५३ मध्ये पीठासीन अधिकाऱ्याच्या नियुक्तीबाबतची प्रक्रिया विहित केली आहे. कलम ५३(२) मध्ये प्राधिकरण ज्या उच्च न्यायालयाच्या क्षेत्राधिकारात आहे, त्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करून पीठासीन अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची तरतूद आहे.

०५. कलम ५३ मधील पोट कलम (१) व (२) मधील तरतुदीनुसार यापूर्वी शासन अधिसूचना दि. १४.०३ ,२०२२ अन्वये श्री. श्रीपाद दत्तात्रय टेकाळे, प्रमुख जिल्हा न्यायाधीश व सत्र न्यायाधीश, यांची पीठासीन अधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. सदर पदावरील श्री. श्रीपाद दत्तात्रय टेकाळे यांचा ३ वर्षांचा कार्यकाळ दि. ०४.०५.२०२५ रोजी संपुष्टात आला असुन दिनांक ०४.०५.२०२५ पासून पिठासीन अधिकारी हे पद रिक्त आहे. रिट याचिका ६३३०/२०२१ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय दि.१३.०२.०२०२५ रोजीच्या आदेशान्वये दिलेले निर्देश पाहता राज्यातील नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील प्राधिकरणाचे न्यायिक कामकाज अखंडीतपणे सुरू असणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजीनगर येथील प्राधिकरणामध्ये ३१.०७.२०२५ अखेर कलम ६४ अन्वये दाखल असलेले ६,३६१ संदर्भ प्रलंबित आहेत,



File No. R&FD-66061(61)/18/2025-MRF(DESKR1)-Revenue and Forest (Computer No. 1102745)
Generated from eOffice by UMESH G MATTE, LNJD-ASO(UGM), ASSISTANT SECTION OFFICER, LAW AND JUDICIARY DEPARTMENT on 01/10/2025 10:55 AM

९९/१२.१९

ही बाब विचारात घेता त्यांचा जलद निपटारा होण्याकरिता पीठासीन अधिकारी या पदावर नियुक्तीसाठी सुयोग्य उमेदवारांची शिफारस विनाविलंब प्राप्त करणे आवश्यक आहे.

०६. अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये पीठासीन अधिकारी पदाचा पदावधी निश्चित केला आहे.त्यानुसार पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत किंवा वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जी गोष्ट अगोदर घडेल त्या दिनांकापर्यंत पदग्रहण करता येईल असे नमूद केले आहे. यास्तव, विधी व न्याय विभागास विनंती करण्यात येते, सदर प्रकरणी मा.मुख्य न्यायाधीश उच्च न्यायालय , मुंबई यांचेशी विचारविनिमय करून पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्तीसाठीव सदर पदावरील नियुक्ती स्विकारण्यास ईच्छुक असणा-या जिल्हा न्यायाधीश संवर्गातील सुयोग्य न्यायिक अधिकाऱ्यांची किमान २ ते ३ नावे अथवा सदर पदावरील नियुक्ती स्विकारुन छत्रपती संभाजीनगर येथील प्राधिकरणाचा कार्यभार स्विकारण्यासाठी विनाविलंब रुजू होण्यास ईच्छुक असणा-या सुयोग्य न्यायिक अधिका-याच्या नावाची शिफारस प्राप्त करुन या विभागास लवकरात लवकर कळवावे , जेणेकरून दि ०४.०५.२०२५ पासून रिक्त होणाऱ्या पीठासीन अधिकारी या पदावर शिफारस केलेल्या उमेदवाराची तात्काळ नियुक्ती करणे शक्य होईल व रिट याचिका ६३३०/२०२१ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय दि.१३.०२.०२०२५ रोजीच्या आदेशान्वये परिच्छेद ३ येथे दिलेले निर्देशानुसार कार्यवाही करुन प्राधिकरणाच्या न्यायिक कामकाजात खंड पडणार नाही.

क. अ. (पुनर्वसन-०१)

उ.स. ( श्री. बागडे )

अ.मु.स ( मदत व पुनर्वसन)

प्र.स. (विधी व न्याय )

eSign

**03/09/2025 01:06 PM**

**YOGESH BHAUSAHEB WAGH**
**ASSISTANT SECTION OFFICER**

**Note # 15**

पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदासाठी मा. उच्च न्यायालयाने शिफारस केलेल्या श्री.श्रीधर एम.भोसले, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांनी सदर नियुक्ती स्विकारण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे अद्यापही रिक्त असलेल्या सदर पदावर तातडीने नियुक्तीसाठी अन्य न्यायिक अधिका-याची मा. उच्च न्यायालयाकडून शिफारस प्राप्त करून घेण्याची विनंती विधि व न्याय विभागाला करण्यात येत आहे.

**11/09/2025 01:22 PM**

**RAJESH HEMCHAND BAGDE**
**DEPUTY SECRETARY**

---